

**।। स्वयंअध्ययन ।।** सुचिता पडळकर

# भूगोल विषयातून भाषाशिक्षण

लहान मुले भाषा कशी शिकतात हा सर्वांच्याच कुतूहलाचा आणि अनुभवाचा विषय आहे. शिकणे हा माणसाचा स्थायीभाव आहे. या नैसर्गिक शक्तीचा उपयोग करून आपल्या भोवतालाचा धांडोळा घेत मुले भाषा शिकतात. 'भाषा शिकणे' यात केवळ गरजेसाठी शिकण्याइतका साधारण हेतू त्यांचा नसावा. शिकण्यात मजा वाटते या बौद्धिक आनंदासाठी मुले भाषा आत्मसात करीत असावीत. म्हणूनच त्यांचा शिकण्याचा वेग अचंबित करणारा असतो. या शिकण्यात सक्ती नसते, अभ्यासाच्या शास्त्रीय पद्धती नसतात, प्रत्येकाने स्वत:ची सरावपद्धत शोधलेली असते. मोठ्या माणसांनी केलेल्या कौतुकामुळे प्रेरणा मिळत असेलही परंतु छोट्यांची आंतरिक ओढ त्यांना शिकण्यास प्रोत्साहित करते असे मला वाटते. अवतीभवती दिसणारे प्राणीपक्षी त्यांचे आवाज, रंग, त्यांच्या मोहक हालचाली बघताना मिळणारा आनंद तर कधी त्यांचीही भीती वाटणे, परिसरातील वहाने, घरातल्या वस्तू त्यांची नावें, त्यांचे उपयोग, त्या सर्वांबरोबर घरातील व्यक्तींचा असणारा बंध, घरी येणारे पाहुणे, शेजारी भेटणारी अनेक माणसे या सगळ्या बोलक्या दुनियेकडून मुले भाषा शिकत असतात. मुलाच्या परिसरात जी भाषा बोलली जाते, जी भाषा त्याच्या कानावर पडते व ज्याला मूल प्रतिसाद देते ती त्याची पहिली भाषा असते. बालशाळेतील चांगले शिक्षक आणि चांगले पालक आपल्या मुलासाठी अनेक अनुभवांची योजनाही करतात असे आपण पाहतो. अनुभवामुळे केवळ नवीन शब्दच कानी पडतात असे नाही तर त्या अनुभवामुळे भावनिक भरणपोषण होते, सामाजिक संदर्भाचे थेंब त्यात असतात. याचा परिणाम म्हणून भाषाविकास होतो. बरेचदा आपण पाहतो छोटी मुले एकटी काही तरी करत असली तरी ती त्याबद्दल मोठ्याने स्वत:शीच बोलत असतात. दोन-चार जण मिळून भातुकलीसारखे खेळ खेळतात

तेव्हा पूर्णवेळ बोलत असतात. मोठ्या माणसांनी त्यांच्यासाठी आणि त्यांच्याबरोबर गायलेली गाणी, त्यांना सांगितलेल्या गोष्टी, त्यांच्याशी मारलेल्या गप्पा या सगळ्यातून त्यांना दुनिया कळत असते, मुख्य म्हणजे गंमत येत असते.
एवढे भाषेचे संचित घेऊन प्राथमिक शाळेत दाखल झालेली मुले आता औपचारिकरीत्या भाषा शिकणार असतात. आजवरचा भाषा शिक्षणाबाबतचा मुलांचा अनुभव आपले आपण शिकायचे असते



असा असतो. हीच नैसर्गिक पद्धत पुढे लिपीपरिचयासाठी अर्थात वाचन लेखनासाठी ठेवली म्हणजेच लिपीपरिचयातही त्यांचा सहभाग घेतला, त्यांच्या अनुभवांचा उपयोग करता आला तर ती हे कौशल्यही जलद शिकतात आणि शिकण्याबाबतचा त्यांचा आत्मविश्वास कायम राहतो. शिकणे ही कष्टप्रद कटकट वाटत नाही. वाढत्या वयाबरोबर विश्व विस्तारणे, शब्दसंग्रह वाढणे, वाचनाची गोडी वाटणे, संभाषणकौशल्य विकसित होणे, साहित्याचा आस्वाद घेणे असा प्रवास सुरू राहतो. या प्रवासात प्रमाणभाषेकडे जाणीवपूर्वक जायचे असते.

प्राथमिक शाळेत मुलांच्या हाती क्रमिक पुस्तके निश्चितपणे असतात. ती पुस्तके इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान अशी कोणत्याही विषयाची असोत, त्यातून आकळणारा विषय, त्या त्या, विषयाची परिभाषा, संकल्पना समजण्यासाठी 'भाषा समजणे' गरजेचे असते. भाषेतूनच हे सारे अभ्यासविषय मुले शिकत असतात. भाषा चांगली येत असली, भाषेची जाण असली की विषयाचे आकलन होणे सोपे जाते हे आपण जाणतोच. उदाहरण द्यायचे झाले तर बेरीज, वजाबाकीसारख्या गणिती क्रिया बिनचूक करणाऱ्या काही मुलांना शाब्दिक गणितात कोणती क्रिया करायला हवी हे लक्षात येत नाही. येथे भाषेची अडचण झालेली असते. म्हणजे कोणताही शालेय विषय शिकण्यासाठी आधी भाषा चांगली यायला हवी. म्हणून इयत्ता पहिली-दुसरीत भाषाविकासावर भर द्यायचा असतो. तिसरीपासून इतिहास, भूगोल, विज्ञान हे विषय स्वतंत्रपणे अभ्यासात येतात. सृजन-आनंद विद्यालय या मी काम करत असणाऱ्या प्राथमिक शाळेत भाषा शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जाते. इयत्ता तिसरी-चौथीला भूगोल विषय शिकवताना माझ्या लक्षात आले की या विषयाच्या संकल्पना नकाशाची भाषा, स्थान, हवामान, पिके, उद्योग, लोकजीवन इत्यादींचे परस्परावलंबीत्व समजणे हे तर अपेक्षितच आहे त्याचबरोबर या विषयाची परिभाषा, या विषयतील येणारे काही खास मराठी शब्द हे मुलांचे भाषाज्ञान वाढवतात. भूगोल हा विषय विज्ञान विषयाची शाखा असल्यामुळे कार्यकारणभाव समजून घ्यायला, तार्किक विचार करायला शिकवतो. संदर्भानुकूल अर्थबोध करण्याचे कसब हा विषय देतो.

आजवर मला माहीत होते की भाषा चांगली येत असली की विषय समजणे सोपे जाते. मी त्याचा त्यास लावण्याचा प्रयत्न केला की इयत्ता तिसरी चौथीतील मुले नव्याने भूगोल विषय शिकत असताना विषयज्ञानाबरोबर त्यांची भाषाही समृद्ध होते हा माझा अनुभव मला तपासून पहायचा

होता. सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात भूगोल या शालेय विषयातून भाषाशिक्षण कसे होते याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला. या कामासाठी सृजन-आनंद विद्यालय, कोल्हापूर या माझ्या शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीत भूगोल अध्यापन करावे, नोंदी ठेवाव्यात, मूल्यमापन करावे व निष्कर्ष काढावेत असे मी ठरवले. विद्यालयात प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या पस्तीसच्या आसपास आहे. विविध अनुभव घेत, प्रत्यक्ष कृती करत, चर्चा करून माहिती मिळवण्याची सवय मुलांना आहे त्यामुळेही मला माझे काम करणे सोपे झाले. माझ्या या अभ्यासाला सेंटर फॉर लँग्वेज लिटरसी अॅण्ड कम्युनिकेशन (CLLC) या फलटणच्या संस्थेने मार्गदर्शन केले. या कामासाठी सर रतन टाटा ट्रस्ट मार्फत विद्यावेतनही मिळाले. या प्रोत्साहनामुळे नियोजनबद्ध, शिस्तपूर्ण काम माझ्या हातून वेळेत झाले.

'भूगोल या शालेय विषयातून भाषाशिक्षण' हा माझा अभ्यासविषय निश्चित केल्यावर प्राथमिक शिक्षणात भाषाशिक्षणाची आणि भूगोल शिक्षणाची उद्दिष्ट्ये काय आहेत हे पाहिले. प्राथमिक शिक्षणाच्या 'अभ्यासक्रमाचा पुनर्रचित मसुदा' या दस्तऐवजात भाषाशिक्षणाची जी उद्दिष्ट्ये नमूद केली आहेत त्यापैकी काही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे -

❍ मातृभाषेतील शब्दसंग्रह, वाक्यरचना यांचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा व त्याचा वापर त्यांना दैनंदिन जीवनात करता यावा.

❍ भाषा हे ज्ञानग्रहणाचे प्रमुख साधन आहे. यासाठी प्रमाणभाषेवर प्रभुत्व मिळवण्याची गरज आहे.

❍ भाषेची जडणघडण समजून घेऊन कमीतकमी शब्दांत व वाक्यांत आपले विचार व भावना कौशल्यपूर्ण रीतीने व्यक्त करता यावेत.

❍ भाषेच्या अभ्यासातून मानवाचा व्यक्तीविकास होतो. भाषा ही विचाराचे साधन आहे. म्हणून भाषाभ्यास आवश्यक आहे. याच मसुद्यात भूगोल विषयाची इयत्ता तिसरी ते पाचवीसाठी सात उद्दिष्टे आहेत. त्यातील दोन उद्दिष्टे पुढील प्रमाणे ❍ परिसरातील निरनिराळ्या भौगोलिक घडामोडी समजून घेणे. व भौगोलिक घडामोडींकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होणे. ❍ परिसरातील घटकांचे परस्परावलंबित्व लक्षात घेणे.

भाषा आणि भूगोल या दोन्ही विषयांची उद्दिष्टे एकत्रितपणे साध्य करण्यासाठी मी पुढील गृहीतके निश्चित केली.


❍ इयत्ता तिसरी आणि चौथीमध्ये अपेक्षित असणाऱ्या भूगोलविषयक संकल्पना समजून घेताना विद्यार्थ्यांच्या भाषा विकासाकडे लक्ष देणे.

❍ भूगोल हा विषय विज्ञान व समाजशास्त्र या दोन्ही अंगाने शिकत असताना विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे व आपला विचार मांडता येणे याकडे लक्ष देणे.

वरील गृहीतकांसाठी शब्द, वाक्य व विचार या तीन क्षेत्रांवर मी लक्ष केंद्रित केले. इयत्ता तिसरी आणि चौथीची भूगोल क्रमिक पुस्तके हे अभ्यासाचे प्रमुख साधन मानले.

शब्द - भूगोल क्रमिक पुस्तकातून दोन प्रकारचे नवीन शब्द मुलांसमोर येतात. ❍ भूगोलातील संकल्पना उदा. भूरुपे, जैविक घटक, दमट हवा इ. ❍ विषयानुरूप अन्य मराठी शब्द. उदा. उष्मा, निरभ्र, प्रमाणबद्ध, मेघ, वराह, हंगाम, बाष्प, विरळ, दैनंदिन असे अनेक शब्द. हे या विषयातून कळतात. या दोन्ही प्रकारच्या शब्दांचे अर्थ कळले की शब्दसंग्रहात भर पडते व आवश्यक तेथे अचूक शब्द वापरून प्रभावी मांडणी करण्याचे कसब मुले प्राप्त करतात. हे दोन्ही

प्रकारचे शब्द शिकण्याची आमची कार्यप्रणाली नोंदवत आहे.



**१) संकल्पना शब्द :** विषय समजून घेताना संकल्पना समजून घ्याव्याच लागतात, त्यासाठी अनुभव, कृती, चर्चा, वस्तू, चित्रे, फोटो, सीडी, पाहाणे अशी साधने वापरली होती. या संकल्पनांचे अर्थ त्यांना कळले किंवा नाही याचा पडताळा घेण्यासाठी वर्षाअखेरीस सर्व संकल्पनांचा अर्थ मुलांनी आपापल्या शब्दात विस्ताराने लिहिला. याला आम्ही 'संकल्पना कोश' असे म्हणत असू. मुलांच्या लेखनात या शब्दांचा अर्थ तर आहेच शिवाय त्याबाबतचे त्यांचे निरीक्षण, अनुभव, मत हेही त्यांनी लिहिले आहे. उदा. अमावस्येविषयी जान्हवी लिहिते, ''पौर्णिमेनंतर पंधरा दिवसांनी अमावस्या येते पौर्णिमेनंतर चंद्राची कला कमी कमी होत जाते. आणि अमावस्येला चंद्र दिसेनासा होतो. सूर्यग्रहण कधीही अमावस्येला होते. अमावस्येला काहीजण गाड्यांची पूजा करतात. काहीजण वेगवेगळ्या अंधश्रद्धा पाळतात. त्या सर्व खोट्या असतात.'' या शैक्षणिक वर्षात २२ जुलै २००९ व १५ जानेवारी २०१० अशी दोनदा सूर्यग्रहणे झाली. ग्रहणे पाहण्यासाठी मुलांनी चष्मे तयार केले. शिवाय इतर साधनांचा उपयोग करून ग्रहणातील सूर्यदर्शन घेतले होते. अमावस्येबाबत लिहिताना तिला अनुभव आठवणे स्वाभाविक आहे. इयत्ता तिसरीतील धैर्यशीलने संगमाबद्दल लिहिले आहे की, 'दोन किंवा अधिक नद्या एकत्र येऊन संगम होतो. पुढे त्याने असेही लिहिले आहे की, आपल्या पंचगंगेचा उगम संगमानेच झाला आहे.' भोगावती आणि कासारी या नद्यांचा संगम प्रयाग चिखली येथे होतो. संगमानंतर पुढे त्या नदीला 'पंचगंगा' म्हणतात. हा संगम मुलांना प्रत्यक्षात दाखवला होता. दृष्यरूपाने पाहिल्यामुळे मुलांचे लेखन स्वानुभावाचे झाले आहे.

**२) क्रमिक पुस्तकात येणाऱ्या अपरिचित शब्दांचा अर्थ समजून घेणे :** पाठाचे वाचन करताना नवीन येणारे शब्द मुले वहीत टिपून घेत असतात. या शब्दांचा अर्थबोध झाल्याखेरीज विषय समजणे अवघड असते. अशी भलीमोठी यादी वर्गात तयार झाली होती. यापैकी काही शब्दांबाबत मुलांच्या लक्षात आणून दिले होते की शब्द सुटा करून पाहिला की त्याचा अर्थबोध आपोआप होतो. उदा. खगोल = ख–गोल, जलौघ = जल+ओघ, वनोत्पादने : वन + उत्पादने. तिसरी पेक्षा चौथीच्या मुलांना हे काम जास्त आवडले. त्यांनी विज्ञान पुस्तकातील सजीव = स+जीव आंतरेंद्रिये : आंतर+ इंद्रिये अशी शब्दफोड करून वर्गात लावली होती.

विद्यालयातील चौथीची मुले भाषेच्या तासाला शब्दकोश पाहतात. नव्या शब्दांचे अर्थ शब्दकोशात पाहा असे मी त्यांना सुचवताच. त्यांना आश्चर्य वाटले. भूगोलातील शब्द मराठी शब्दकोशात मिळतील असे त्यांना वाटले नव्हते. त्यांचा हा प्रतिसाद माझ्यासाठी नवा होता. मग ऊर्जा, पाणलोट, दुर्गम असे शब्द शब्दकोशातून समजून घ्यायचा सपाटा त्यांनी लावला.

एकदा गंमत झाली. इयत्ता चौथीच्या पुस्तकातील महाराष्ट्र प्राकृतिक (पृ. १२) वर पुळण असा शब्द आला. पाठ अभ्यासताना पुळण म्हणजे समुद्रकिनारी लाटांमुळे तयार झालेले वाळूचे पट्टे

असा अर्थ सांगितला होता. शब्दकोशातून मुलांची पुन्हा तपासणी सुरू होती. त्यात पुळण म्हणजे वाळवंट असा अर्थ दिला होता. मुले शब्दकोश घेऊन माझ्याकडे आली. मी शब्दकोश पाहत असताना एक मुलगा मला म्हणाला, ''ताई तुम्ही आधी शब्दकोशात हा शब्द पाहिला नव्हता का? तर दुसरा म्हणाला, ''थांबा ताई, वरदा प्रकाशनाच्या शब्दकोशातही अर्थ पाहू या.'' मला मुलांचा चौकसपणा, ज्ञानलालसा महत्त्वाची वाटते. या निमित्ताने संदर्भ लक्षात घेऊन वाक्याचा अर्थ लावायचा असतो अशी चर्चा झाली.

आता आमच्या अभ्यासाचा दुसरा टप्पा थोडा समजून घेऊ. तो आहे संयुक्त वाक्य तयार करणे. इयत्ता चौथीच्या भूगोल पुस्तकात कार्यकारण भाव दाखवणारी संयुक्त वाक्ये आहेत. उदा. आपल्या जिल्ह्याला समुद्र नाही त्यामुळे मीठ व अन्य सागरी उत्पादने सागर किनारा लाभलेल्या भागातून आपल्या जिल्ह्यात येतात. (पृ. २४) भौगोलिक कारणांचा होणारा परिणाम लक्षात घेऊन वाक्यरचना करणे या हेतूने मुलांनी वाक्य तयार करायची होती. अर्थात हे काम अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर घेतले होते. अशी वाक्यरचना तयार करण्यासाठी जर-तर आणि त्यामुळे - परंतु, किंवा, म्हणून, मात्र, पण इत्यादी शब्द वापरून संयुक्त वाक्य तयार झाले. वर्गात तयार झालेली भरपूर वाक्ये आपण अवश्य वाचा. इथे मात्र नमुन्यादाखल काही वाक्ये दिली आहेत.

**जर** पृथ्वी फिरायची थांबली **तर** दिवस-रात्र होणार नाही.

**जर** आपण पाणी जिरवले **तर** विहिरी भरतील.

महाराष्ट्रातील नर्मदा **आणि** तापी या पश्चिमवाहिनी नद्या आहेत.

प्राणी अभयारण्य नागझिरा येथे आहे. **आणि** पक्षी अभयारण्य जायकवाडी येथे आहे.

महाराष्ट्र बेसाल्ट खडकांचा आहे **त्यामुळे** येथे जास्त पाणी मुरत नाही.

कोकणात समुद्र आहे **त्यामुळे** तेथे दमट हवा आहे.

गोदावरी महाराष्ट्रात उगम पावून आंध्रप्रदेशात जाते **परंतु** ती परत महाराष्ट्रात येते.

राष्ट्रीय महामार्ग दुपदरी **किंवा** चौपदरी असतात.

मासे जास्त काळ टिकावेत **म्हणून** त्यांना वाळवतात, खारवतात.

अगोदर आदिवासी पुरुष लंगोटी घालत होते. **मात्र** आता ते शर्टपँट घालतात.

हे काम करताना मुलांना मजा वाटली. त्यात माहिती तर महत्त्वाची होतीच. पण निर्मितीचा आनंद जास्त होता. हे काम करताना त्यांनी शोधलेले निष्कर्ष पहा. १) काही वेळा आपण वाक्याच्या सुरुवातीला जर घेत नाही पण पुढे फक्त तर घेतो तेव्हा 'जर' मनात धरलेला असतो. उदा. पाऊस पडला नाही तर पिके कशी येणार?

२) मात्र, परंतु हे दोन्ही शब्द एकाच अर्थी वापरता येतात.

उदा. आपण विहिरीचे पाणी पितो मात्र समुद्राचे पित नाही.

आपण विहिरीचे पाणी पितो परंतु समुद्राचे पित नाही.

३) त्यामुळे, म्हणून हे दोन शब्द सुद्धा एकाच अर्थी वापरता येतात. उदा. ओझोनचा थर आहे म्हणून आपण जगू शकतो.

ओझोनचा थर आहे म्हणून आपण जगू शकतो.

४) वाक्याचा दुसरा भाग आधी घेतला तर कारण ऐवजी म्हणून ने वाक्य होते.

उदा. मुंबईत जास्त लोकसंख्या आहे कारण तेथे उद्योगधंदे आहेत.

मुंबईत उद्योगधंदे भरपूर आहेत म्हणून तेथे लोकसंख्या जास्त आहे.

यावरून असे लक्षात येते की कार्यकारणभाव लक्षात घेऊन वाक्यरचना करण्याची क्षमता मुले

मिळवतात तसेच भाषेचे निरीक्षणही ती करू शकतात. आशयात फरक न करता विविध पद्धतीने वाक्यरचना करता येणे हे समृद्ध दर्जाचे भाषाज्ञान आहे असे वाटते.



'वाक्यरचना' या भाषिक कौशल्यात आणखी एक उपक्रम मी घेतला होता तो म्हणजे भूगोल विषयासंबंधी घोषणा करणे. विद्यालयात घोषणा तयार करण्याची, देण्याची संधी वारंवार मिळत असते त्यामुळे हे काम ते पेलू शकतील असे मला वाटत होते. अपेक्षित होते की मुलांनी वहीत घोषणा लिहाव्यात आणि वाचून दाखवाव्यात. परंतु मौखिक रचनेवर मुलांचा भर होता. याचा परिणाम असा झाला की वर्गात फार उत्साही वातावरण तयार झाले. एकमेकांना मदत करणे, एकाची अर्धी रचना दुसऱ्याने पूर्ण करणे, एकाने सांगितलेली पहिली अर्धी रचना अनेक प्रकारे अनेकांनी पूर्ण करणे याला अक्षरश: उधाण आले होते. वाचू या काही घोषणा.

१) आमचा भूगोल तिची आहे भाषा, करतो आम्ही वाचन नकाशा.

२) कळसूबाई आहे पर्वतावर, पावसाचा परिणाम होतो शेतीवर

३) नकाशे आहेत पुस्तकात, अर्थ शोधूया परिसरात.

घोषणा तयार करणे हे काम तसे सोपे नसते. यात विषयाचे आकलन आणि यमक जुळून अर्थपूर्ण रचना करता येणे हे दोन्ही महत्त्वाचे असते.

आता आमच्या शोध अभ्यासाचा तिसरा टप्पा समजून घेऊ. तो होता विचारप्रवृत्त होणे. भाषा हे विचारांचे साधन आहे. भूगोलातील माहितीबाबतचा विचार मुले करत होती. या टप्प्यावर आम्ही क्रमिक पुस्तकातून बाहेर पडलो. वर्तमानपत्रातील भौगोलिक बातम्यांचा उपयोग करून विचार मांडणे हे काम सुरू झाले. वर्तमानपत्रातील विषयानुकूल चित्रे/फोटो पाहून विचार करणे, आपल्या शब्दात ते मांडणे, शीर्षक देणे, वर्तमानपत्रातील बातमी आपल्या शब्दात संक्षेप करून लिहिणे, बातमीला प्रश्न विचारणे, बातमीवर आपले मत नोंदवणे, चित्रात किंवा बातमीत त्रुटी आढळल्यास संपादकांना पत्र लिहिणे असे काम तिसरी चौथीत वर्षाअखेरी उत्तम झाले. वर्तमानपत्र हे सर्वत्र उपलब्ध असणारे ग्राह्य व स्वस्त साधन आहे. याचा उपयोग शिक्षणात हरतऱ्हेने करता येतो. एकावेळेस अनेकांना हाताळता येईल असे ते बहुपयोगी साधन आम्ही भूगोल अभ्यास आणि भाषिक अभिव्यक्तीसाठी भरपूर वापरले.

भूगोल विषय अभ्यासणे हे मुलांचे काम वर्षभर सुरू होते. त्यात भाषाविकास कसा होत आहे, मुलांची भाषा समृद्ध होते म्हणजेच त्यांना नवे शब्द कळतात ते योग्य प्रकारे वापरता येतात. वाक्यरचनेचा विचार करता येतो. आणि विचार करणे-मांडणे हे जे भाषेचे महत्त्वाचे अंग आहे त्यासाठी भूगोल ह्या विषयाची मी मदत घेत होतो. तशा त्याच्या नोंदी ठेवल्या होत्या. वर्गात विषयांतर्गत होणारी प्रदर्शने उदा. खडकांचे प्रकार, तेलबिया इ. ऊर्जासाधनांचे त्रिमिती प्रदर्शन यावेळी मुलांनी केलेले माहिती तक्ते हे सुद्धा लेखनाचे विषय होते. नाट्यीकरण हे एक प्रभावी

माध्यम आहे. वाहतुकीचे मार्ग शिकताना केवळ ढोबळ माहितीवर न थांबता पायवाटा, रानवाटा, पगदंडी, गल्लीतील अरुंद रस्ते, धरणावरील रस्ता, राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग असा मोठा पट मुलांनी नाटकातून उत्स्फूर्तपणे मांडला. आठवडे बाजार आणि मॉल यांमधील संवाद करताना त्यांची निरीक्षणे जशी महत्त्वाची होती तशी काही मूल्येही ती मांडत होती. शिकणे म्हणजे आत्मसात करणे, शिकणे म्हणजे विचार करणे, शिकणे म्हणजे प्रगट होणे हे मी माझ्या शोधअभ्यासात वारंवार अनुभवत होते. काही भाग मी वाचनपाठातून वर्गात लावत असे शाश्वत शेती आणि धरण हे दोन मुद्दे मुलांनी स्वयंवाचनाने समजून घेतले होते. भूगोलातल्या खुणा वापरून परिच्छेद लेखन्, गोष्ट लिहिणे ह्या अधूनमधून वापरलेल्या पद्धती. दिशावंदना ही आमच्या निमाताईंनी तयार करून दिलेली प्रार्थना दिशा दृढीकरणासाठी निश्चितच उपयोगाची आहे त्याचबरोबर भौगोलिक संदर्भ, सांस्कृतिक समृद्धी यातून गाणाऱ्यांचे भावनिक पोषण करणारीही आहे.

भूगोल या शालेय विषयातून भाषाशिक्षण कसे होते. कसे घडवता येते या अभ्यासात मुलांनी ज्या ताकदीने माझ्या हेतुंना न्याय दिला त्यातून मला कळले की–

- सामान्यत: भाषेतून आपण शिकतो आणि इतर विषय शिकताना आपली भाषा अधिक चांगली होते.
- विषयज्ञानावर पकड असली की भाषेकडे अधिक लक्ष देता येते. नेमके शब्द वापरण्यासाठी धडपड सुरू होते.
- माहिती मिळवण्यासाठी प्रत्येक विषयाची स्वत:ची साधने असतात पृथ्वीगोल, नकाशे, तापमापी, पर्जन्यमापक, दिशादर्शक यंत्र इ. साधने भूगोलसाधने आहेत. पण शब्दकोशही भूगोलसाधन होऊ शकते.
- सर्व स्तरातील मुलांना सर्वत्र उपलब्ध असणारे वर्तमानपत्र हे साधन सर्वकाळ उपयोगी आहे.
- शिक्षकाने शोध घेण्यासाठी शिकवायचे ठरवले की नवनव्या अध्यापन पद्धती आपल्याला सुचतात. वेगळ्या विषयात वापरल्या जाणाऱ्या पद्धती या विषयासाठी वापरून तपासताही येतात.
- मी माझ्या शाळेत म्हणजे सृजन आनंद विद्यालयात हा शोध अभ्यास केला त्या शाळेला प्रयोगशीलतेचे अस्तर असल्यामुळे मला मुलांकडून दमदार प्रतिसाद मिळाला. अशा प्रकारच्या कामाची, संधीची त्यांना सवय होती.
- वर्गात विद्यार्थी संख्या ३५ च्या आसपास असणे. मुलांची मातृभाषा आणि शिकण्याची माध्यमभाषा एकच म्हणजे मराठी असणे यामुळेही आम्ही सखोलतेने अभ्यास करू शकलो असे मला वाटते.

अशा प्रकारे वर्षभर चाललेल्या या प्रकल्पातून मला बरेच शिकायला मिळाले.

❑❑

### वाचकांना आवाहन

शिक्षणवेध या मासिकातून आम्ही आधुनिक शिक्षणाची विशिष्ट भूमिका मांडत आहोत. या विचाराला अनुसरून वैचारिक लेख, ज्ञानरचनावादाच्या अंगाने केलेले शैक्षणिक प्रयोग, शालेय भाषाशिक्षणाविषयीचे लेख, मुलांच्या प्रतिसादाचे अनुभव तसेच कथा, पथनाट्य, काव्य इ. ललित साहित्य तुम्ही आम्हाला पाठवू शकता. वरील विषयावरील लेख आम्हाला पोस्टाने अथवा मेलद्वारे जरूर पाठवा. आपल्या दर्जेदार लेखांचे आम्ही स्वागत करू.